# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - ४
## सभावृत्तांत

दिनांक - २/७/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.०२/०७/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.बारणे अर्चना तानाजी
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
७. मा.एॅड भोसले सचिन सुरेश
८. मा.निलेश हिरामण बारणे
९. मा.सविता बाळकृष्ण खुळे
१०. मा.सुनिता हेमंत तापकीर
११. मा.चंद्रकांत बारकु नखाते
१२. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१३. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य
१४. मा.विनोद हनुमंत तापकिर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.देवन्ना गट्टुवार – कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री.सुपे ए के - लेखा अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.बाबासाहेब गलबले – कनिष्ठ अभियंता (विद्युत), श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.इनामदार एस जी. – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.मोमीन ए. ए – कनिष्ठ अभियंता, श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी,श्री.कलाल आय के – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.गणेश राऊत,श्री.शिर्के एस व्ही,श्री.सतिष तायडे – विद्युत, श्री.कोरेवार एस बी – कनिष्ठ अभियंता (स्थापत्य),श्री.तावरे एम एम – कनिष्ठ अभियंता (नगररचना),श्री.बंडगर एस

बी – जलनि:सारण,श्री.मोरमारे एस व्ही – कनिष्ठ अभियंता,पाणीपुरवठा,श्री.बी आर साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.अहिरे एस एन – उपअभियंता,पाणीपुरवठा, श्री.संदिप मो.पाडवी – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.मगर एस एम – कनिष्ठ अभियंता,श्री.सुर्यकांत मोहिते – उपअभियंता जलनि:सारण, डॉ.अरुण दगडे – पशु वैद्यकिय अधिकारी, श्री.बी के तापकिर – वृक्षसंवर्धन, श्री.अनिल मगर – क्रिडा पर्यवेक्षक, क्रिडा, श्री.कोळप श्रीकांत - अतिक्रमण, इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि. ४/६/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्र. ३ ) कायम करणेत येत आहे.

-------

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक- १
दिनांक- २/०७/२०१८
सूचक- मा.बाबासाहेब त्रिभुवन अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

**संदर्भ –** मा. कार्यकारी अभियंता विद्युत यांचे जा.क्र.गक्षेका/वि/इंजि/५०९/२०१८ दि.२६/६/२०१८ चे पत्र

मा.कार्यकारी अभियंता विद्युत यांचे जा.क्र.गक्षेका/वि/इंजि/५०९/२०१८ दि.२६/६/२०१८ चे पत्रानुसार ग क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत विद्युत विभागाने सन २०१८ – १९ चे अंदाजपत्रक सादर केले होते. सदर अंदाजपत्रकास मा.महापालिका सभा ठराव क्र.१७७,दिनांक २०/४/२०१८ अन्वये मान्यता दिली आहे परंतु महसुली अंदाजपत्रकातील सन २०१८ – १९ चे किरकोळ देखभाल दुरुस्ती लेखाशिर्ष वरील पानांक ६७१ अ.क्र.१३ ते ३६ एकुण २४ कामांचे समोर कामाचे अंदाजपत्रकिय रक्कम रकान्यांमध्ये प्रत्येक ० (शुन्य) रक्कम दर्शविणेत आली आहे. सोबत अंदाजपत्रकात पानांची झेरॉक्स जोडली आहे. तरी सोबत जोडलेल्या प्रपत्र अ नुसार एकुण २४ इतक्या कामांचे समोर अंदाजपत्रकीय रक्कम रकान्यात र.रु.१०,००,०००/- रक्कम दर्शवुन, त्यास प्रशासकिय मान्यता मिळाल्यास देखभाल दुरुस्तीचे कार्यालय निविदा काढणे शक्य आहे. तरी सोबत जोडलेल्या प्रपत्र अ प्रमाणे विद्युत किरकोळ देखभाल दुरुस्ती ( क्षेत्रिय स्तर) कामांना मा.ग क्षेत्रिय समिती सभेची प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

**सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे**

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक- २
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.सविता खुळे अनुमोदक – मा.सुनिता तापकिर

**संदर्भ –** मा.सविता खुळे यांचे दिनांक ०२/०७/२०१८ चे पत्र

मा.सविता खुळे  यांचे दिनांक ०२/०७/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२७ मधील विमल गार्डन पासुन खाली अंजना हॉटेल पासुन थोडे खाली या चौकाला खुळे कॉर्नर असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

दि.२/०७/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** प्रभाग समिती मासिक सभेकरीता बी आर टी विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहत नाहीत.

**मा.संदिप गाडे -** विद्युत विभागाकडुन मागील वर्षी किती LED लाईट्स बसविणेत आले, केबल किती, कुठल्या प्रभागात व कुठे टाकण्यात आल्या याची सविस्तर माहिती देणेत यावी. बजेट मध्ये असल्याप्रमाणे प्रभागाची सर्व कामे होणार आहेत का? संबंधित अधिका-यांनी मिटींगसाठी येतांना मागील सभेमध्ये झालेल्या ठरावांची सविस्तर माहिती घेऊन यावे.

**श्री.बाबासाहेब गलबले (कनिष्ठ अभियंता विद्युत)** - सदर विषयाबाबत योग्य ती सविस्तर माहिती घेऊन लवकरात लवकर देण्याचा मी प्रयत्न करतो.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** प्रभाग क्र.२३ थेरगाव शाळेमधील विद्युतविषयक कामे झाली का

**श्री.सतिष तायडे कनिष्ठ अभियंता (विद्युत) –** सदर शाळेमधील विद्युतविषयक सर्व कामे झालेली आहेत.

**मा.निलेश बारणे** - मागील सभेमध्ये चर्चा झालेप्रमाणे ग प्रभाग कार्यालयातील तळमजल्यातील काही जागा हि पोस्ट ऑफिससाठी देणेत यावी.

**मा.अभिषेक बारणे –** ग प्रभाग कार्यालयातील तळमजल्यातील जागा हि पोस्ट ऑफिससाठी देण्यास हरकत वाटत नाही, सध्या सदर जागेत इतरही कार्यालय परवानगी शिवाय कार्यरत आहेत.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** ग प्रभाग कार्यालय येथील तळमजल्यातील कार्यालये हि ग प्रभाग कार्यालयाशी संबंधित कार्यालये आहेत. तरीही गट्टुवार साहेबांनी सदर जागेची पाहणी करावी, या जागेत पोस्ट ऑफिससाठी मान्यता देणेचे आपणास अधिकार आहेत का ते पाहण्यात यावे.

**श्री.देवन्ना गट्टुवार (कार्यकारी अभियंता, स्थापत्य)**- सदर विषयाबाबत प्रभाग स्तरीय बैठकित ठराव मंजुर करुन तो स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पाठविणेत यावा.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** सदर विषयासंदर्भात लवकरात लवकर एक ठराव मंजुर करुन स्टँण्डींगच्या मान्यतेसाठी पाठविणेत यावा.

**मा.निलेश बारणे - डांगे चौक प्रभाग क्रमांक २४** येथील ओव्हरब्रिजच्या खाली नेहमीच बॅनर किंवा पोस्टर्स लावले जातात, वारंवार प्रभाग समितीमध्ये सांगुनही सदर पोस्टर्स व होर्डींगचे बाबत कुठलीहि कारवाई केली जात नाही. यासंदर्भात थेरगाव फाऊंडेशन कडे व्हीडिओ क्लिप

देखील आहे. सदर संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात यावा.

**श्री.श्रीकांत कोळप (अतिक्रमण पथक प्रमुख) -** पोस्टर्स व स्टीकर्स चिकटवणा-यांवर कारवाई करण्याचे अधिकार अतिक्रमण विभागाकडे नाहीत. पोस्टर्स व स्टीकर्सवर कारवाई करण्याचे काम हे आरोग्य विभागाकडे आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** – आरोग्य विभागाला लवकरात लवकर पत्र पाठवावे व ताबडतोब गुन्हा दाखल करण्यात यावा.

**मा.अभिषेक बारणे** - सदर अधिका-यांकडुन संबंधित काम हे त्यांचे अधिकारात नाही याप्रमाणे लिहुन घ्या असे सांगण्यात आले होते.

**मा.संदिप गाडे** – अडचणीचे वेळी ब-याच अधिका-यांचे फोन बंद असतात. उद्यान व ड्रेनेज विभागातील अधिका-यांचे फोन बंद असल्याने संपर्क होऊ शकला नाही.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** उद्यान विभागाकडुन पावसामुळे पडलेली झाडे लवकर उचलली जात नाहीत, त्यांचे कर्मचारी उपलब्ध नसतात.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी**) – दिनांक २१/६/२०१८ रोजी झालेल्या पावसामुळे पडलेले झाड हे उशिरा उचलले गेले , त्यासंदर्भात श्री.तापकिर यांनी त्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे, अशा स्वरुपाची अडचण पुन्हा येऊ नये यासाठी उद्यान विभागाकडुन ठेकेदाराची २ माणसे रात्रभर आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयात थांबणार आहेत, तसे आदेश आजच काढण्यात यावे त्या व्यतिरीक्त उद्यान विभागाकडुन योग्य ती कार्यवाही होईल.

**मा.अभिषेक बारणे** – प्रभाग कार्यालयात तक्रार नोंदविण्यासाठी एक संपर्क क्रमांक सुरु करण्यात यावा, जेथे नागरिक व सन्मा.नगरसदस्य त्यांची तक्रार नोंदवु शकतात व त्याव्दारे तक्रार सबंधित अधिका-यापर्यंत पोहचविण्यात येईल.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** – आपत्कालीन विभागाचा नंबर तक्रार निवारणाकरीता देण्यात आलेला आहे, सदर विभागांतर्गत त्या त्या विभागाकडे संबंधित तक्रार नोंदविली जाते.

**मा.संदिप गाडे** – अतिक्रमणाबाबत कारवाई होणे गरजेचे आहे.याबाबत प्रभाग अधिकारी यांनी वॉर्डमध्ये स्वत: फिरुन पाहणी करावी. योग्य त्या ठिकाणी बॅरिगेट लावणे गरजेचे आहे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** – अतिक्रमण कारवाई व फ्री लेफ्ट यासाठी मी स्वत: वॉर्डमध्ये पाहणी केली, पाहणीअंतर्गत मार्किंग व बॅरिगेट करणार असल्याचे संबंधित इंजिनिअर यांनी सागितले आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** रहाटणी फाटयालाही बॅरिगेट लावणेत यावे.

BRT विभागातील अधिकारी/कर्मचारी प्रभाग समिती सभेस उपस्थित नसतात, त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** – स्थापत्य विभागाने BRTS विभागास पत्र द्यावे.

**मा.गोपाळ  माळेकर** – १ महिना झाला तरी ड्रेनेजसाठी गाडी येत नाही. लाईट, पाणी व रस्ता हे महत्वाचे आहे, याकडे अधिका-यांनी लक्ष द्यायला हवे.  अधिका-यांना फोन केले की त्यांच्याकडे कामासाठी माणसे उपलब्ध नसतात.  वॉर्डमधील नागरिक परिस्थीती समजुन घेत नाही, त्यांना केवळ काम झाले पाहिजे म्हणुन नगरसदस्यांना वारंवार फोन येत राहतात.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** यासंदर्भात पाटील साहेबांशी बोलणे झालेले असुन ४ दिवसात काम होईल असे त्यांनी सांगितले, तसेच आयुक्तांशी सुध्दा बोलणे झालेले आहे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी**) – ड्रेनेज गाडया व लाईन याबाबत श्री.बंडगर यांनी वस्तुस्थिती काय आहे ते सांगावे, योग्य ती माहिती द्यावी.

**श्री.बंडगर एस बी (कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण विभाग) –** थेरगाव भागासाठी मा.आयुक्त सो यांचे मंजुरीने चेंबरमधील गाळ साफसफाईसाठी (Jetting, Grab, Rodding  एकत्रित ) मशीनची तातडीने भाडेतत्वावर पुरविणेबाबत निविदा कार्यवाही चालु आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –**  परिस कॉलनी व त्रिशक्ती कॉलनीतील लाईन टाकण्यात आली आहे परंतु ती जोडणी कधी करणार आहेत.

**मा.संदिप वाघेरे –** कैलास नगर , शास्त्रीनगर येथे पाणी चोक अप झाले तसेच मिलिंदनगरमध्ये सर्व लाईन चोक अप आहेत.

**मा.सुनिता तापकिर –**  प्रभाग क्रमांक २७ मध्ये  साईराज कॉलनी येथे मशीन व कामगार दोन्हीही उपलब्ध नाहीत.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी**) – प्रभागातील काही भाग हा  Critical आहे, जेथे पाणी जमा होऊ शकते.

१) मिलिंदनगर
२) जय मल्हार नगर
३) पवारनगर
४) शास्त्रीनगर
५) धनगरनगर

या अनुषंगाने आपण Solution  देता येते का ते पहावे.  दिनांक २१/०६/२०१८ रोजी झालेल्या पावसामुळे आलेल्या अडचणी विचारात घेऊन आयुक्तांकडुन त्यानंतर एक बैठक आयोजित करण्यात आली.  ग प्रभागातील ड्रेनेज व स्थापत्य  विभागाकडुन सदर अडचणी सोडवणे शक्य न झाल्यास त्याप्रमाणे सांगण्यात यावे व तसा Report  तयार करावा.  त्यासंदर्भात आपण बैठक आयोजित करु.

**मा.विनोद तापकिर** – प्रभागामध्ये ड्रेनेजची गाडी पाठवायला हवी.

**मा.संदिप वाघेरे** – प्रभाग क्र.  २१  मध्ये मोठया प्रमाणात कुत्रे, डुकरे व ड्रेनेज साफसफाई या तीन समस्या प्रामुख्याने आहेत.  याबाबत प्रभाग स्तरावर काही कारवाई होणे शक्य आहे का ?

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** :- मोकाट जनावरे यासंदर्भात डॉ.रॉय यांचेशी माझे बोलणे झाले आहे, यापुर्वी जो कॉन्ट्रॅक्टर सदर काम पाहत होता त्याचे कॉन्ट्रॅक्ट संपलेले आहे, तरीही त्याचेशी चर्चा करुन ते याबाबत सांगणार आहेत.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** ग प्रभागात वरील विषयाबाबत एक बैठक आयोजित करु.

**मा.अर्चना बारणे -** प्रभाग क्र.२४ मध्ये पत्र दिल्याप्रमाणे औषध फवारणी झाली नाही.

**मा.सुनिता तापकिर –** तापकिर मळा व श्रीनगर येथील कुत्र्यांवर कारवाई करा.मोकाट कुत्रे रहाटणी गावात ज्येष्ठ नागरिकांना पायाला चावा घेतात. तापकिर मळा येथे बंद पाईपलाईन टाकायला हवी.
प्रभाग क्र.२७, सर्व्हे नंबर ७२ येथील रस्ता रद्द करण्यास सांगितले होते, त्याबद्दल काय कारवाई झाली.

**श्री.एम एम तावरे (कनिष्ठ अभियंता, नगररचना) -** यासंदर्भात बांधकाम परवानगीस पत्र दिलेले आहे.

**मा.चंद्रकांत नखाते -** वारंवार कुत्र्यांसाठी गाडी बोलवावी लागते.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** – न्यायालयाने कुत्रे पकण्याबाबत नियम केलेले आहे. कुत्रे पकडल्यानंतर त्यांची नसबंदी करुन पुन्हा त्यांच्या हॅबिटेट मध्ये सोडावे लागतात.

**मा.सविता खुळे** – प्रभाग क्र. २७ मध्ये **DP** शिफ्ट करायचा होता, सदर डीपी हा रस्त्यातुन बाजुला घ्यायचाय ते काम झाले नाही.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** सदर काम हे MSEB चे आहे.

**मा.अर्चना बारणे –** प्रभाग क्र.२३ मध्ये पत्र दिल्यानंतर एकदाच कचरा गाडी आली व त्यानंतर आलीच नाही.

**मा.सविता खुळे** – रत्नदिप कॉलनी , पुष्पजीत कॉलनी येथे घरात पावसाचे पाणी आल्यास Emergency असतांना काय व्यवस्था करता येईल.

**श्री.देवन्ना गट्टुवार (कार्यकारी अभियंता, स्थापत्य)** – वरीलप्रमाणे घरात पाणी आले असता, पंपाची व्यवस्था करता येईल.

**मा.सुनिता तापकिर –** सिध्दीविनायक कॉलनी येथे श्री.गिल यांचेकडे ही घरासमोर पाणी साचलंय, यासाठी योग्य ती व्यवस्था करावी व ड्रेनेज विभागाने याकडे लक्ष द्यावे. पुरंदर कॉलनी येथे गतिरोधकामुळे पाणी साचुन राहते.

**मा.सविता खुळे -** प्रभाग क्र.२७ मधील विमल गार्डन पासुन खाली अंजना हॉटेल पासुन थोडे खाली या चौकाला खुळे कॉर्नर असे नाव देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.सुनिता तापकिर यांनी प्रभागातील तक्रारींचे लेखी निवेदन दिले.**

१) बेकायदेशीर फ्लेक्स व होर्डींग्ज बाबत परिसरातील होर्डींग्जवर कार्यवाही व्हावी. तापकिर चौक, रहाटणी फाटा, कुणाल हॉटेल, नखाते वस्ती रहाटणी चौक

२) चेंबर्स साफ करण्याची मशीन व जेंटींग मशीन वेळोवेळी मागून पण मिळत नाही व चेंबरची सफाई चांगल्या प्रकारे होत नाही

३) तापकिर मळा रोड येथे डुकरांचा उपद्रव वाढला आहे व त्याच्यावर लवकरात लवकर कार्यवाही व पकडुन परिसरात त्याच्यामुळे दुर्गंधी वाढली आहे यावर कार्यवाही करावी.

४) स्टॉर्म वॉटर्स चेंबर्स सफाई करण्यात येत नाही, सांगुन पण होत नाही.

५) खड्डे बुजवण्यासाठी डांबर मागुन पण मिळत नाही आणि काम होत नाही

६) धुर फवारणी वेळेवर होत नाही, परिसरात मच्छरांचे प्रमाण वाढले आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** अनधिकृत फ्लेक्स व फुटपाथवरील अतिक्रमण यावर कडक कारवाई झाली पाहिजे.

**श्री.श्रीकांत कोळप (अतिक्रमण पथक प्रमुख) -** सह शहर अभियंता राजन पाटिल यांचेकडे कारवाईचे सर्व काम आहे, त्यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे काम केले जाते. अतिक्रमण कारवाई दरम्यान जप्त केलेले सर्व साहित्य हे नेहरुनगर गोडाऊन येथे जमा करुन ते **Demolish** केले जाते. चिंचवड मध्ये काल २२ फ्लेक्स काढणेचे काम करण्यात आले.

**मा.चंद्रकांत नखाते** - माझे ऑफिस ते कुणाल हॉटेल दरम्यान च्या रस्त्यावरील हातगाडया व टप-या लवकरात लवकर उचलण्यात याव्या. रस्त्यांवरील माजी नगरसेवक व पदाधिकारी यांचे नावाचे बोर्ड काढण्यात यावे. वारंवार सांगुनही बोर्ड संदर्भात कारवाई झालेली नाही.

**श्री.ओहोळ व्ही.बी (उपअभियंता, स्थापत्य) –** पावसामुळे असलेल्या इतर कामांमुळे हे काम राहिले आहे, लवकरात लवकर बोर्ड काढणेचे काम केले जाईल.

**मा.चंद्रकांत नखाते –** प्रभाग क्र.२७ मध्ये पावसामुळे बरेच नागरिकांच्या घरात पाणी जाते, पर्याय म्हणुन स्टॉर्म वॉटर १८ मी डीपीचे उद् घाटन झालेय, पण काम चालु झाले नाही.

**श्री.ओहोळ व्ही.बी (उपअभियंता, स्थापत्य) – त्या ठिकाणी** Demarcation **चालु होते.**

**मा.सुनिता तापकिर –** ढीग उचलावे. श्री.तांबे हे कधीही प्रभाग समिती सभेसाठी उपस्थित राहत नाहीत, त्यांना नोटीस देण्यात यावी.
साई कॉलनी, सुयोग कॉलनी येथे पाण्याच्या समस्या आहेत.
शिवराजनगर येथे नळाला पाणी खराब येते.

**श्री.बी.आर साबळे (उपअभियंता)** - जी पाईपलाईन आहे त्यात Gravity आहे, तेथुन ब-याच सोसायटयांना कनेक्शन दिले जाते. प्रायोगिक ड्रॉईंग तयार केले आहे, ३ ते ४ दिवसात ड्रॉईंग अपडेट होईल. (गुलमोहोर कॉलनी)

**मा.गोपाळ माळेकर** – मोटार लावुन पाणी घेतले जाते, अशा ठिकाणी मोटार जप्त करण्यात यावी, त्यामुळे कारवाई लवकर होईल.

(पवार नगर (गोकुळ स्वीट ) या भागात गढुळ पाणी येते.)

**श्री.बी.आर साबळे (उपअभियंता** ) - पाईपलाईन ब्रेक करण्याशिवाय पर्याय नव्हता, आज पाणी सुरु होईल. पर्यायी टँकरची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी**) - ड्रेनेजविषयी सुध्दा अनेक तक्रारी आहेत, या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी ड्रेनेज विषयी सविस्तर माहिती द्यावी

**श्री.प्रशांत पाटील (कार्यकारी अभियंता, जलनि:सारण)** - ग प्रभागाचे नवीन टेंडर प्रोसेस केले. ५ दिवस काम केले.मशीनने काम चांगले होते. Additional मशिनरी घेऊन काम करता येईल. नोट सँक्शन करुन घेतो. निविदा पुर्ण होईपर्यंत Extention दिले होते.
नवीन टेंडर नुसार एका प्रभागासाठी एक असे मशीन देण्यात आले आहे.

**मा.चंद्रकांत नखाते** – प्रभागात Tata Ace च्या ३ गाडया द्या. रस्त्यांचे काम झालेनंतर मट्रेल उचलल्यानंतर होल मध्ये घुशी जातात, असे असतांना सदर ठिकाणी सिमेंट टाकुन घ्या.

**श्री.प्रशांत पाटील (कार्यकारी अभियंता, जलनि:सारण)** चोकअप ड्रेनेज लाईन काढल्यानंतर जेटींग मशीनने पुर्ण निघुन जाते, जेंटींग मशीनने पुर्ण लाईन साफ होते. हे मशीन special असल्याने सध्या एकच आहे. अजुन एका मशीनसाठी मी प्रयत्न करतो.

**मा.चंद्रकांत नखाते** – वॉर्डमध्ये औषधफवारणी, साफसफाई, रोज रस्ता साफ होणे हि कामे झाली पाहिजे. पशुवैद्यकिय विभागाकडे किती कुत्रा गाडी उपलब्ध आहेत?

**डॉ.अरुण दगडे (पशुवैद्यकिय अधिकारी**) – सध्या २ गाडया उपलब्ध आहेत.

**मा.सुनिता तापकिर** - गुरुकुल कॉलनी ओढयाच्या पलीकडे ते यशकॉलनी पर्यंत पाणी येते.

**मा.चंद्रकांत नखाते** - अतिक्रमण कारवाईच्या वेळी अधिकारी बरोबर हवे. कॉंक्रीट रस्त्यावरील अतिक्रमण काढायला हवे.

**श्री.देवन्ना गट्टुवार (कार्यकारी अभियंता, स्थापत्य**) – टेंडर प्रक्रियेमुळे वेळ गेला.

**मा.गोपाळ माळेकर** – शाळा क्रमांक ५५ रहाटणी येथे पाण्याच्या टाकीचा प्रॉब्लेम आहे, तेथे पिण्याच्या पाण्याची टाकी नाही, त्यामुळे मुलांना पाणी प्यायला घरी जावे लागते, असे असतांना रस्ता क्रॉस करतांना कुठलाही अपघात होऊ शकतो याकरीता तेथे लवकरात लवकर पाण्याची टाकी बसविण्यात यावी.

**श्री.इम्रान कलाल ( कनिष्ठ अभियंता, स्थापत्य)** – टेरस वरती २००० लीटरची टाकी बसविलेली आहे तसेच Undergroun Tank ची मागणी केलेली आहे. त्यास अनुसरुन २०१८ – १९ बजेट मध्ये कामाचा समावेश करणेत आला आहे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** – आरोग्य विभागासंदर्भात पाहणी केली असता, २ शिफ्ट मध्ये ३२ गाडया आहेत. ३२ पैकी २७ चालु आहेत. काही कार्यशाळेत आहेत. नवीन वाहनांसाठी स्थायी समिती मध्ये विषय ठेवलेला आहे. गाडया व ड्रायव्हर वाढवणार आहेत. अधिकाधीक राऊंड वाढवण्याचा प्रयत्न आहे. ठेकेदारांचे कर्मचारी ९६ आहेत. आरोग्य विभागाचे २७५ कर्मचारी आहेत. कर्मचारी कमी असल्याकारणाने Strenth कमी पडते.

मा.अर्चना बारणे मॅडम यांनी दिलेल्या पत्रानुसार औष्णिक धुरीकरणाचे शेडयुल हे त्यांनी सुचविलेप्रमाणे व Rotation मध्ये करणेबाबत काय कार्यवाही केली याबद्दल आरोग्य अधिकारी **श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी)** यांनी स्पष्टीकरण द्यावे.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी)** – सद्यस्थितीत कर्मचारी कमी असल्याने पुर्वीच्या Rotation प्रमाणे कामकाज चालु आहे.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/५९ /२०१८
दिनांक - ११ /०७/२०१८

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या
ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही